नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २६/०७/२०२२ (मंगळवार)**

**(सायंकाळ)**

---

# बेला हद्दीतील चिमनाझरी शिवारातील अनोळखी प्रेताच्या खुनाचे गुढ उकलले

## (स्थानिक गुन्हे शाखा व बेला पोलीसांची संयुक्त कारवाई)

दि. २२/०७/२०२२ रोजी बेला हद्दीतील चिमनाझरी शिवारात एका २५ ते ३० वयोगटातील अनोळखी पुरुष इसमाचा मृतदेह आढळून आला. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन बेला येथे अज्ञात आरोपीविरुध्द खूनाच्या गुन्हाची नोंद करण्यात आली. या घटनेची माहिती नागपूर ग्रामीणचे वरिष्ठ पोलीस अधीकाऱ्यांना मिळाल्याने त्यांनी घटनास्थळी येवून भेट दिली. घटनास्थळी मिळून आलेल्या मृतदेहाची पहाणी केली असता सदर मृतदेहाचे अंगात लाल रंगाची टी शर्ट ज्यावर इंग्रजीत 'Volleyball' लिहीले असून कमरेला दोरी व दगडाला बांधून मृतदेह नाल्यामध्ये फेकून दिल्याचे दिसून आले. या प्रकरणाचा उलगडा करण्यासाठी पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांनी बेला पोलीसांचे व स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथके तयार करुन वेगवेगळया मार्गाने तपास सुरु केला. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक खालासा ढाबा चिमनाझरी येथे चौकशी करीता गेले असता ढाब्याच्या मालकाकडून मृतकाची ओळख पटली. मृतक हा बालाघाट येथील निवासी भागचंद उर्फ अजय ग्यानचंद वरकडे, रा. वार्ड नं. ८, उमरीया ठेकेदार, बालाघाट असून हैद्राबाद येथील धाबा मसाईपेठ रेल्वे येथे काम करायचा. दि. २१/०७/२०२२ रोजी मृतक बालाघाट येथून हैद्राबाद येथे जाण्याकरीता निघाला असता रस्त्यामध्ये महामार्गावरील खालसा ढाबा, चिमनाझरी येथे जेवण करण्याकरीता थांबला होता. जेवन करुन मृतक ढाब्यावर झोपी गेला. रात्री दरम्यान अचानक मृतक हा झोपेतून उठून ढाब्यासमोरील ईश्वर मसराम यांचे शेतातकडे गेला होता. मसराम यांचे शेताचे धुऱ्यांवर जंगली जनावरांचा धुमाकुळ रोखन्यासाठी खुल्या विद्युत प्रवाही तारा लावल्या होता. त्या विद्युत ताराच्या संपर्कात आल्याने मृतक भागचंद याचा जागीच मृत्यु झाला. श्री मसराम यांचे शेतावर राखनदार म्हणुन असलेला दिलीप शिर्शीकर याला शेतामध्ये पडून असलेला मृतदेह दिसल्याने त्याने मालक मसराम यांना त्याची खबर दिली व मृतदेहावर पाला पाचोळा टाकुन मृतदेह लपवून ठेवला. शेत मालक ईश्वर मसराम यांना त्यांचेवर मोठे बालंट आले हे लक्षात येताच त्यांनी त्यांचा भाचा राहुल परतेकी यांचेसोबत मिळून मृतकास दोरी व दगडाने बांधून त्यांचे शेतापासून सुमारे १ किमी अंतरावर असलेल्या नाल्यामध्ये फेकून दिले. सदर प्रकरणी बेला पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपी १) ईश्वर दमडूजी मसराम वय ५२ वर्ष, रा. मोहगांव, २) राहुल देविदास परतेकी, वय २६ वर्ष रा. मोहगांव आणि ३) दिलीप लक्ष्मण शिर्शीकर, वय ३५ वर्ष, रा. बामणी यांना ताब्यात घेतले.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर व अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणीकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पुजा गायकवाड यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण व पोलीस स्टेशन बेला येथील पथकाने पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर